# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक- २०९** **दिनांक १३/०७/२०२२**

## अतीवृष्टी व वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दरड कोसळण्याच्या घटनेबाबत नागरिकांनी घाबरुन न जाता दक्षता घेण्याबाबत पोलीसांचे आवाहन.

आज दिनांक १३/०७/२०२२ रोजी सकाळी ६:३० वाजताचे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील त्रिनीडी हायस्कुल, वागराळपाडा, ता. वसई जि. पालघर येथील बैठया चाळीचे घरावर दरड कोसळून घरातील ४ व्यक्ती ढिगाऱ्याखाली अडकल्याची माहिती प्राप्त झाल्याने स्थानिक वालीव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी पोहचून तात्काळ प्राथमिक मदतकार्य चालू केले. तसेच सदर ठिकाणी स्थानिक नागरिक, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाचे पथक, वसई-विरार महानगरपालिकेचे पथक, अग्नीशमन पथक व पोलीस पथकाने तात्काळ बचावकार्य राबवून घरातील दबलेल्या श्रीमती वंदना अमित सिंग वय-३३ व ओम अमित सिंग वय १० या दोघांना बाहेर काढून आय. सी. एस. हॉस्पीटल, एव्हरशाईन, वसई पुर्व येथे उपचारकामी दाखल केलेले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र अमित जितेंद्र सिंग वय-३५ व रोशनी अमित सिंग वय-१४ या दोघांचा सदर घटनेमध्ये दुर्दैवी मुत्यू झालेला आहे. सदर परिसरामध्ये पुन्हा दरड कोसळण्याची शक्यता लक्षात घेवून सुमारे ४० कुटूंबियांना महानगरपालिका, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन पथक व स्थानिक स्वयंसेवकांचे मदतीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात येत आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्री पंकज शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त, तुळींज विभाग तसेच स्थानिक पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार घटनास्थळावर दाखल झालेले आहेत. सध्या महाराष्ट्रभर होत असलेल्या संततधार पावसामुळे बऱ्याच ठिकाणी पाणी साठण्याच्या व दरड कोसळण्यासारख्या घटना घडत असल्याने नागरिकांनी योग्य दक्षता घेण्याबाबत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे कोणतीही आपत्कालीन घटना घडल्यास तात्काळ ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांचे वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

--------ooo--------